| MHMM260004802023 | प्राप्त दिनांक | : | ०७/०६/२०२३. |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | ०७/०६/२०२३. |
| | निकाल दिनांक | : | २०/०५/२०२५. |
| | कालावधी | : | ०१ वर्षे, ११ महिने, १३ दिवस. |
| | **निशाणी क्र.** | : | **३३** |

**महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात**
**३६ वे न्यायालय, मुंबई सेंट्रल, मुंबई**
**(न्यायनिर्णय कलम ३५५ फौ. प्र. सं. अन्वये)**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | खटला क्रमांक | :— | ३४५/पीडब्ल्यू/२०२३. |
| | सी.एन.आर. क्रमांक | | एमएचएमएम२६०००४८०२०२३. |
| (ब) | अपराध घडल्याची तारीख | :— | २२/०२/२०२३. |
| (क) | फिर्यादीचे नाव<br>(अभियोग पक्ष) | :— | महाराष्ट्र सरकार,<br>द्वारा — वरिष्ठ पोलीस निरिक्षक,<br>मुंबई सेंट्रल लोहमार्ग पोलीस ठाणे.<br>(गुन्हा नोंद क्र. १७२/२०२३). |
| (ड) | आरोपीचे नाव | :— | जावेद सलीम मलकनी.<br>वय :— ३८ वर्षे.<br>काम धंदा :— नोकरी.<br>रा.ठि.:— डोंगरी, मुंबई. |
| प) | कोणत्या स्वरूपाचा गुन्हा आहे ? | :— | भारतीय दंड विधान कलम ४११ प्रमाणे. |
| (फ) | आरोपीला गुन्हा कबुल आहे का ? | :— | आरोपीला गुन्हा कबुल नाही. |
| (ब) | अंतिम आदेश | :— | आरोपीची गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| (भ) | आदेशाचा दिनांक | :— | २०/०५/२०२५. |

अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी विद्वान विधिज्ञ :— श्री. आर. व्ही. तिवारी
आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ :— श्री. हरीष व्होरा

**न्यायनिर्णय** दि. २०/०५/२०२५.

प्रस्तूतचा खटला हा आरोपीच्या विरूध्द् भारतीय दंड विधान कलम ४११ अन्वये दाखल करण्यात आला व चालविण्यात आला आहे.

२. प्रस्तूतच्या खटल्यातील अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात असे आहे कि, फिर्यादी नामे प्रजिता हनुमंत खेरटकर, राहणार विरार, पालघर ही दि. २२/०२/२०२३ रोजी १७.१० वाजता लंगडा ब्रिजवरून चढून ब्रिजवरून चालत जात असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेवून तिच्या सॅकबॅगची चेन खोलून तिचा व तिच्या वहिनीचा असे दोन्ही मोबाईल फोन नकळत काढून मुददाम लबाडीने चोरून नेले. सदर गुन्हयातील चोरी झालेला मोबाईल फोन आरोपीने तो बिल बॉक्स नसतांना तो चोरीचा आहे हे माहित असून देखील तो विकत घेवून विकला.

३. फिर्यादी प्रजिता हनुमंत खेरटकर हिने दिलेल्या जबाबावरून मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्रमांक १७२/२०२३, भारतीय दंड विधान कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. अभिलेखावरील कागदपत्रांवरून असे दिसून येते की, त्यानंतर सदरचा गुन्हा तपासाकरीता पो.हवालदार श्री. डी. पी. चव्हाण, मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस स्टेशन यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी सदर गुन्ह्याचा तपास करून आरोपीच्या विरूध्द या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४. प्रस्तूत खटल्यामध्ये निशाणी क्र. ०६ कडे आरोपी विरूध्द भारतीय दंड विधान कलम ४११ प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपावरून दोषारोप निश्चित करून आरोपीला त्याच्यावर ठेवलेले आरोप वाचुन दाखविले असता व समजावून सांगितले असता त्याने तो नाकारला व कामकाज पुढे चालू ठेवण्याची विनंती केली.

५. आरोपी विरूध्द सदरचे आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे एकुण चार साक्षीदार तपासण्यात आले व दिंनाक १६.१०.२०२४ रोजी निशाणी क्र. ०१ वर पारित केलेल्या आदेशान्वये अभियोग पक्षाचा साक्षपुरावा बंद करण्यात आला. आरोपी विरूध्द आलेला आक्षेपार्ह पुरावा फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वये (नि.क्र.३२) आरोपीला वाचून व समाजावून दाखविण्यात आला. आरोपीने त्यांच्या जबाबात संपूर्ण नकारात्मक बचाव घेतलेला असून त्यांच्या विरूध्द खोटी केस केली असल्याचे सांगितले. आरोपीने स्वत :च्या बचावार्थ स्वत:ला अथवा इतर कोणत्याही साक्षीदाराला तपासले नाही. तसेच कोणताही कागदोपत्री पुरावा देखील दाखल केलेला नाही.

६. प्रस्तुत खटल्याच्या कामी दोन्ही पक्षांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला असता व या खटल्यातील रेकॉर्डवरील पुरावा पहाता प्रस्तुत खटल्याच्या निकालाकरीता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होत असुन त्यांचे निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह नोंदविलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे शाबीत केले का की, दि. २२/०२/२०२३ रोजी, सुमारे १७.१० वाजताच्या दरम्यान, आरोपीने, फिर्यादीचा चोरीस गेलेला मोबाईल हॅण्डसेट, चोरीचा असल्याचे माहित असून सुध्दा हेतूपुर्वक, स्वेच्छेने, विना बिल व बॉक्स विकत घेतला आणि त्याची विक्री केली आणि त्या अनुषंगाने भारतीय दंड संहितेच्या कलम | |

४११ नुसारचा गुन्हा केला आहे? ... नकारर्थी.

२. आदेश काय? ... अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

७. प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपी विरूध्दचे आरोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षातर्फे एकूण चार साक्षीदार तपासले. ते खालीलप्रमाणे :—

| अनु क्रंमाक | साक्षीदारांचे नांव | साक्षीदार कंमाक | साक्षीदारांची स्थिती | निशाणी क्रंमाक |
|---|---|---|---|---|
| १. | प्रजिता हनुमंत खेरटकर | साक्षीदार.क्र.१ | फिर्यादी | निशाणी.क्र १० |
| २. | अशिष जयेंद्र पंन्डया | साक्षीदार.क्र.२ | पंच साक्षीदार | निशाणी.क्र १६ |
| ३. | गंगाधर कारभारी दोंड | साक्षीदार.क्र.३ | पोलिस साक्षीदार | निशाणी.क्र २० |
| ४. | दिनेश पंढरीनाथ चव्हाण | साक्षीदार.क्र.४ | तपासिक अंमलदार | निशाणी.क्र २५ |

याव्यतिरिक्त अभियोगपक्षातर्फे फिर्याद (नि.क्र.११), पंचनामा (नि.क्र.१७), मुददेमाल पावती (नि.क्र.२६), व पोलिस रिपोर्ट (नि.क्र.२७) या दस्तऐवजावर विश्वास ठेवण्यात आला.

### मुद्दा क्र. १ बाबत :—

८. भा.द.वि कलम ४११ अंतर्गत आरोपी विरूध्दचे आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने खालील बाबी सिध्द करणे गरजेचे ठरते.

**Section 411 :- Essential Ingredients**

*1) That, some property was stolen.*

*2) That, the accused received or retained such property.*

*3) That, the accused received or retained it dishonestly.*

*4) That, the accused did so knowingly or having reason to believe that such property was stolen.*

९. त्याअनुषंगाने अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन करणे गरजेचे ठरते. साक्षीदार क्रमांक ०१ प्रजिता हनुमंत खेरटकर (फिर्यादी) यांच्या सरतपासात असे आले आहे की, दिनांक २०.०२.२०२३ रोजी तिला दादरला यायचे होते व दादर वरून तिच्या वहिनीना सायनला सोडायचे होते. त्यासाठी तिने विरार रेल्वे स्टेशनवरून दादर जाणारी लोकल ट्रेन पकडली होती. त्यानंतर सदरची लोकल ट्रेन दादरला पोहचल्यानंतर ती त्या ठिकाणी उतरली व फलाट क्र. ०५ वर येवून थांबली. त्यावेळी तिला तिच्या भावाचा कॉल आला. तिच्या भावाशी बोलणे झाल्यानंतर तिने तिचा मोबाईल फोन तसेच तिच्या वहिनीचा मोबाईल फोन तिच्या सॅकबॅगच्या पुढील कप्प्यात ठेवले. त्यावेळी तिने सदरची सॅकबॅग तिच्या खांदयास अडकवलेली होती. त्यानंतर ती व तिची वहिनी लंगडा ब्रिजवर चढले. त्यावेळी त्या ठिकाणी प्रवाशांची भरपूर गर्दी होती. ती व तिची वहिनी गर्दी मधून चालत होते. तिला तिच्या भावाला फोन करायचा होता म्हणून तिने तिची सॅकबॅग पुढे घेतली. त्यावेळी तिला तिच्या सॅकबॅग ची चेन उघडी असल्याचे दिसली व तिने सॅकबॅग मध्ये ठेवलेला तिचा व तिच्या वहिनीचा मोबाईल फोन दिसला नाही. तिचा मोबाईल फोन सॅमसंग गॅलेक्सी ऑन ५ हा होता व तिच्या वहिनीचा ओप्पो कंपनीचा मोरपंखी रंगाचा मोबाईल फोन होता व त्यामध्ये जिओ व वोडाफोन कंपनीचे सिम कार्ड होते. तिचा मोबाईल फोन गोल्डन रंगाचा होता. सदरचे मोबाईल फोन चोरी झाल्या बद्दल तिने फिर्याद दाखल केली होती. त्यानंतर दोन दिवसानंतर दिनांक २४.०२.२०२३ रोजी पोलिसांनी तिचा पुरवणी जबाब घेतला होता. त्यावेळी तिने पोलिसांना दोन्ही मोबाईल फोनचे बिल बॉक्स दिले होते. सदर मोबाईल फोन पैकी तिचा सॅमसंग कंपनीचा

मोबाईल फोन तिला परत मिळाला होता. सदरचा मोबाईल फोन खराब झाल्यामुळे तिने तो सोबत आणलेला नाही.

१०. तिच्या उलटतपासात असे आले आहे की, तिचा मोबाईल फोन चोरणा—या व्यक्तीला तिने बघितले नव्हते. मोबाईल फोन ओळखण्याकामी पोलिसांनी तिला बोलावले होते. त्यावेळी तिच्या मोबाईल फोन मध्ये सिम कार्ड नव्हते. त्यावेळी पोलिसांनी तिला तिचा एकच मोबाईल फोन दाखविला होता. ती तिचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन हजर करू शकत नाही.

११. साक्षीदार क्र ०२ अशिष जयेंद्र पंन्डया (पंच साक्षीदार) यांच्या सरतपासात असे आले आहे की, दिनांक १७.०५.२०२३ रोजी चव्हाण साहेबांनी त्यांना मुंबई सेंट्रल रेल्वे पोलिस स्टेशन येथे बोलावले होते. त्यावेळी त्यांच्या सोबत दुसरा पंच नुरूददीन हा होता. त्याप्रमाणे ते पोलिस स्टेशनला गेले होते. त्या ठिकाणी अविनाश पाटील या नावाचा एक इसम बसलेला होता व जावेद मलकानी हा देखील बसलेला होता. त्यावेळी चव्हाण साहेबांनी त्यांना असे सांगितले की, मोबाईल फोन ट्रेसिंग मध्ये एक सॅमसंग नोट ५ मोबाईल फोन मिळालेला आहे. सदरचा मोबाईल फोन हा ट्रेसिंग मध्ये अविनाश पाटील याच्याकडून मिळाला होता. त्यावेळी अविनाश पाटील याने असे सांगितले की, सदरचा मोबाईल फोन हा त्याने जावेद कडून घेतला आहे. त्यानंतर जावेदला विचारले असता त्याने सांगितले की, कोणीतरी अज्ञात व्यक्तीने सदरचा मोबाईल फोन मला दिला होता. त्यानंतर पोलिसांनी सदरचा मोबाईल फोन जप्त केला. त्यानंतर त्यांच्या समक्ष पंचनामा तयार केला.

१२. त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की, दिनेश

चव्हाण यांना ते मागील ०२ ते ०३ वर्षापासून ओळखतात. दिनेश चव्हाण जेव्हा केव्हा त्यांना बोलावतात तेव्हा ते पंच म्हणून जातात. त्यांनी मोबाईल फोन बघितला होता. सदर मोबाईल फोन मध्ये अविनाश पाटील च्या नावाचे सिम कार्ड होते. त्यांच्यासमक्ष पोलिसांनी, आरोपीने अविनाश पाटील कडून सदरचा मोबाईल फोन कधी विकत घेतला होता याबाबत आरोपीकडे चौकशी केली नव्हती. मुददेमाल न्यायालयासमक्ष नाही. आरोपी अविनाश पाटील ला ओळखत नव्हता असे असू शकते.

१३. साक्षीदार क्र ०३ गंगाधर कारभारी दोंड (पोलिस साक्षीदार) यांच्या सरतपासात असे आले आहे की, दिनांक १७.०५.२०२३ रोजी त्यांची दिवसपाळीची गुन्हे प्रकटीकरण शाखा येथे डयुटी होती. त्या दिवशी चव्हाण यांनी अविनाश पाटील यांना फोन करून पोलिस स्टेशनला बोलावून घेतले होते. त्यांच्याकडे गोल्डन रंगाचा सॅमसंग गॅलेक्सी ऑन ५ हा मोबाईल फोन ट्रेस झाला होता. सदर मोबाईल फोनचा आय.एम.ई.आय. नंबर सायबर सेल पोलिस आयुक्तालय यांच्याकडे ट्रेसिंग करीता पाठविला होता. त्यावेळी त्याने असे सांगितले की, सदरचा मोबाईल फोन त्याने जावेद मलकानी यांच्याकडून विकत घेतला होता, तो चालत नव्हता म्हणून त्यांनी तो त्यांना परत केला. त्यानंतर जावेद मलकानी यांना पोलिस स्टेशनला बोलावून घेतले व त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, सदरचा मोबाईल फोन त्यांनी अनोळखी इसमाकडून विकत घेतला होता. त्यानंतर दोन पंचांना बोलावून त्यांच्या समक्ष पंचनामा केला व मोबाईल फोन ताब्यात घेतला.

१४. त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की, सदरचा मोबाईल फोन ट्रेसिंग कामी दिनांक २२.०४.२०२३ रोजी पाठविला होता.

ट्रेसिंगचा रिपोर्ट कधी प्राप्त झाला होता हे त्यांना आठवत नाही. सदर मोबाईल फोन मध्ये अविनाश पाटील याच्या नावाचे सिम कार्ड होते. सदरचा मोबाईल फोन पोलिस स्टेशन मध्ये हजर केला त्यावेळेस त्यामध्ये सिम कार्ड नव्हते. सदरचा मोबाईल फोन अविनाश पाटील याच्या ताब्यातून जप्त केला नव्हता. ते मागील दोन वर्षापासून मोबाईल फोन ट्रेसिंग मध्ये काम करतात. याआधीच्या पंचनाम्यावर देखील पंच आशिष पंडया व नुरउददीन सेलीया यांनी पंच म्हणून सहया केलेल्या आहेत. मोबाईल फोन न्यायालयासमक्ष नाही.

१५. साक्षीदार क्र. ०४ दिनेश पंढरीनाथ चव्हाण (तपासिक अंमलदार) यांच्या सरतपासात असे आले आहे की, दिनांक १७.०५.२०२३ रोजी त्यांची डयुटी मुंबई सेंट्रल रेल्वे पोलिस स्टेशन येथे मोबाईल फोन ट्रेसिंग कामी होती. मुंबई सेंट्रल रेल्वे पोलिस स्टेशन येथे गु.र.नं. १७२/२०२३ भा.दं.वि. कलम ३७९ हा दाखल होता. सदर गुन्हयामध्ये दोन मोबाईल फोन चोरीला गेले होते. त्यापैकी एका मोबाईल फोनचा आय.एम.ई.आय. नंबर नसल्याने फिर्यादीला बोलावून त्यांच्याकडून सदर मोबाईल फोनचा आय.एम.ई.आय. नंबर प्राप्त केला व तसा त्यांचा जबाब घेतला होता. त्यानंतर दोन्ही मोबाईल फोनचे आय.एम.ई.आय. नंबर ट्रेसिंगला पाठविले असता दिनांक १७.०५.२०२३ रोजी ट्रेसिंग रिपोर्ट प्राप्त झाला होता. त्यावेळी त्यांना सायबर सेल मार्फत एअरटेल कंपनीकडून ट्रेसिंग रिपोर्ट प्राप्त झाला होता. त्यामध्ये एअरटेल कंपनीचे सिमकार्ड नंबर ९०२८१४४२१३ असा होता. त्यानंबर वर संपर्क केला असता अविनाश पाटील नावाचा इसम अलिबाग येथून बोलत असल्याचे सांगितले. त्यांना सदर गुन्हयाची हकिकत समजावून सांगून पोलिस स्टेशनला हजर राहण्यास सांगितले.

त्याप्रमाणे ते पोलिस स्टेशनला हजर झाले. त्यांना गुन्हयाची हकिकत समजावून सांगून ते वापरत असलेल्या मोबाईल फोन बाबत चौकशी केली असता त्यांनी तो मोबाईल फोन जावेद मलकानी नावाच्या इसमाकडून विकत घेतल्याचे सांगितले. परंतु सदरचा मोबाईल फोन नादुरूस्त झाल्यामुळे तो पुन्हा त्याला परत केला असल्याचे सांगितले. त्यानंतर अविनाश पाटील यांच्या सोबत ते स्वतः जावेद मलकानी यांच्या सहारा मार्केट येथील दुकानामध्ये गेले. त्यांना गुन्हयाची हकिकत समजावून सांगितली असता त्यांनी सांगितले की, सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन एका अनोळखी इसमाकडून रूपये १५००/— मध्ये विकत घेतला आहे. त्यानंतर त्यांना सोबत घेवून पोलिस स्टेशन मध्ये आले. त्यानंतर लागलीच दोन पंचांना बोलावून त्यांना गुन्हयाची हकिकत सांगून गुन्हयातील मोबाईल फोन चेक करून तो खात्री झाल्यानंतर तो जप्त केला. सदरचा मोबाईल फोन सॅमसंग ऑन ५ असा होता. त्यानंतर पंचांच्या सहयांचे लेबल लावून तो मुददेमाल कक्षात जमा केला व त्याची मुददेमाल पावती फाडली. मुददेमाल न्यायालयासमक्ष नाही.

१६. त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की, त्यांना प्राप्त झालेला सी.डी.आर. आरोपीच्या नावाचा नव्हता. अविनाश पाटील याने आरोपीकडून सदरचा मोबाईल फोन विकत घेतल्याबाबतच्या बिलाची प्रत प्राप्त केली नव्हती. अविनाश पाटील याने सदरचा मोबाईल फोन नादुरूस्त असल्यामुळे आरोपीला परत केला होता त्याबाबतचा कोणताही दस्त त्यांनी अविनाश पाटील याच्याकडून प्राप्त केला नव्हता. त्यांनी अविनाश पाटील यांचा जबाब नोंदविला नव्हता. तसेच अविनाश पाटील ला सदर केस मध्ये साक्षीदार देखील बनविले नाही. आरोपीने सदरचा

मोबाईल फोन अविनाश पाटील याला विकला होता असा कोणताही पुरावा त्यांनी सदर केस मध्ये लावलेला नाही. पंच नाम्यावरील पंच साक्षीदार ब—याच केसेस मध्ये पंच म्हणून सहया केलेल्या आहेत. दिनांक २२.०२.२०२३ रोजी फिर्यादीने लोकल ट्रेनने प्रवास केला होता याबाबतचे रेल्वे तिकिट फिर्यादीकडून प्राप्त केले नव्हते. फिर्यादीने दिलेल्या फिर्याद प्रमाणे सदरचा मोबाईल फोन लेडीज कंपार्टमेंट मध्ये चोरी झाला होता.

१७. प्रस्तुत प्रकरणातील सर्व साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केल्या नंतर असे दिसून येते की, साक्षीदार क्र. ३ व ४ यांच्या साक्षीपुराव्यानुसार आविनाश पाटील याने मोबाईल फोन आरोपी जावेद मलकानी यांच्याकडून विकत घेतल्याचे तोंडी स्वरूपात सांगितले. मात्र, या मोबाईल खरेदीविषयी कोणतेही बील, पावती, लेखी व्यवहार, उघड पुरावा किंवा आर्थिक व्यवहाराचे समर्थन करणारा दस्त जप्त करण्यात आलेला नाही. याचा अर्थ असा की, ज्या आधारावर आरोपीने चोरीचा मोबाईल दुस—या व्यक्तीला दिला होता असे म्हटले जात आहे, त्याचे लिखित स्वरूपात शाश्वत समर्थन सादर करण्यात आलेले नाही. केवळ तोंडी जबाबावर आधार ठेवून आरोपीने मोबाईल विकला असे मानणे पुराव्याच्या कक्षेत अपूर्ण ठरते. अशा परिस्थितीत, आरोपीने चोरीचा मोबाईल विकला होता हे सिध्द करणारा कुठलाही वस्तुनिष्ठ दस्त नाही. न्यायालयीन प्रक्रियेत दोषारोप सिद्ध करण्यासाठी पुरावा हा केवळ शंका नव्हे तर खात्रीपूर्वक, ठोस व शंका न शिल्लक राहील असा असावा लागतो. तसेच जर आविनाश पाटील खरोखर आरोपीकडून मोबाईल विकत घेत असल्याचा दावा करत असेल, तर त्याचा प्रत्यक्ष साक्षीपुरावा आवश्यक होता. कारण त्याच्यामुळेच मोबाईल

आरोपीकडे होता हे प्रत्यक्ष सिध्द होऊ शकले असते. त्याला साक्षीदार न बनविल्यामुळे आरोपीकडून मोबाईल मिळाल्याची थेट पुरावा साखळी तुटते. तसेच तपास अधिकारी आणि पोलिस साक्षीदारांनी सांगितले आहे की, आविनाश पाटीलने चौकशीदरम्यान सांगितले की, मोबाईल त्याने आरोपीकडून घेतला होता. मात्र, त्याचे लेखी टिपण, स्टेटमेंट किंवा १६१ CrPC अंतर्गत जबाब घेतलेले नाहीत. अशी महत्त्वाची माहिती तोंडी स्वरूपात सादर करून, तिची लेखी नोंद ठेवलेली नसणे ही तपासातील गंभीर त्रुटी आहे. यातून न्यायालयासमोर त्याच्या जबाबाची विश्वसनीयता कमी होते.

१८. फिर्यादीला चोरीला गेलेला मोबाईल परत मिळून सुध्दा, तो न्यायालयासमक्ष हजर केलेला नाही. गुन्ह्याशी संबंधित चोरीचा मोबाईलच जर न्यायालयात सादर झाला नाही, तर तो मोबाईल हा फिर्यादीचा आहे, हे साक्षी व ओळखीतून सिध्द करणे अशक्य होते. यामुळे नुसते पंचनामे व तोंडी साक्ष यांच्या आधारे गुन्ह्यातील मालमत्ता आरोपीकडे होती असे मानणे न्याय्य ठरत नाही. गुन्ह्यातील मुख्य पुरावा चोरीचा मोबाईल आरोपीकडे होता हे सिध्द करणारा थेट पुरावा गैरहजर आहे. तसेच आविनाश पाटीलची साक्ष किंवा जबाब असता तर मोबाईलची मालकी व साखळी निश्चित करता आली असती. तसेच मुददेमाल न सादर केल्याने, मालमत्तेवर ओळख होऊन आरोपीवर गुन्हा निश्चित करणे अशक्य बनते. आविनाश पाटील याने मोबाईल फोन खरेदी केला असा दावा पोलिसांकडून मांडण्यात आला असला, तरी त्याचे कोणतेही दस्त पुरावे सादर करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अभियोगपक्षातर्फे तपासाण्यात आलेल्या साक्षीदारांचा साक्षीपुरावा निश्चितच आरोपीला दोषी ठरविण्याइतपत पुरेसा ठरत नाही. करिता मुद्दा क्र.–१ चा निष्कर्ष

नकारार्थी नोंदविण्यात येत आहे. सबब, आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. म्हणून मुद्दा क्र.—२ वरील उत्तराकरीता खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. आरोपी नामे जावेद सलीम मलकनी, यांस भारतीय दंड संहिता कलम ४११ अन्वयेच्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) नूसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीची बंधपत्रे आणि वैयक्तिक जातमुचलके आव्हानाच्या कालावधी पर्यत कायम करण्यात येतात.

३. जप्त मुददेमाल फिर्यादी यांना परत केला असल्याने त्यांनी सादर केलेला सुपूर्तनामा, आव्हानाचा कालावधी संपल्यानंतर रद्द करण्यात यावा.

४. सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

BHAGWAT KISAN GAWANDE
Digitally signed by BHAGWAT KISAN GAWANDE
Date: 2025.05.20 15:54:51 +0530

(भा. कि. गावंडे)
महानगर दंडाधिकारी,
३६वे न्यायालय, मुंबई सेंट्रल, मुंबई.

दि.:— २०/०५/२०२५.

आलम

थेट संगणक टंकलिखित :— २०/०५/२०२५
स्वाक्षरी दिनांक. :— २०/०५/२०२५
आलम.